# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४**

## पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: वाय-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१५,पाणीपुरवठा व स्वच्छता**<br>**बाब क्रमांक: २७७, रूपये:- २,९०,००,००,०००/-**<br>**अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१) | ६५४२ | १० | अमरावती जिल्हयातील २००७ मध्ये अतिवृष्टी वलगांव येथील पुनर्वसन मध्ये पाणी पुरवठा योजनेकरिता ९२ लक्ष ८५ हजार ५०० अंदाजपत्रिकीय किंमत मंजूर असून प्राप्त अनुदान ५ लक्ष आहे. उर्वरीत अनुदान ८७ लक्ष ८५ हजार ५०० अद्यापही मिळालेले नाही. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ६५४५ | १० | जिल्हा परिषद कडून ग्रामीण भागात जलजिवन मिशन योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यात योजना राबविण्यात येत असून तिवसा, मोर्शी व अमरावती तालुक्यातील गावांचा समावेश आहे. सन २०२१-२२ मध्ये जलजिवन मिशन अंतर्गत ७ कामे मंजूर तसेच सन २०२२-२३ मध्ये ३७ कामे असे एकूण ४४ कामे मंजूर होती. परंतु अद्यापही सर्व कामे पुर्ण झालेली नाहीत. साधारणपणे ३० ते ४० टक्केच्या आत आहेत. नागरिकांना उन्हाळ्यामधील पाणी टंचाई लक्षात घेता वेळीच पाणी मिळेल याकरिता कंत्राटदाराकडून वेळीच कामे पुर्ण करुन घेण्याकरिता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. |
| (३) | ६५४९ | १० | अमरावती जिल्हयातील १०५ गावे वाढीव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (विश्रोळी) ही योजना महाराष्ट्र जिवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग अमरावती यांचेकडून खारपाणपट्याकरिता सन २००८ मध्ये मंजूर झालेली १०५ गावाकरिता विश्रोळी धरणातून राबविण्यात येत असून सन २०२३ च्या २ लाख ६५ हजार ४०० लोकसंख्येकरिता दरडोई ४० लिटर याप्रमाणे संकल्पीत करण्यात आलेली होती व त्यानुसार सुरु असणे, या योजनेअंतर्गत तिवसा मतदारसंघातील भातकुली तालुक्यातील बहुतांश गावे खारपाणपट्यातील असल्यामुळे शेवटच्या गावापर्यंत नागरिकांच्या पाणी पोहचू शकत नाही व मिळणारे पाणी हे ३ ते ४ दिवसाच्या कालावधीने मिळत असणे, या योजनेतील खारपाणपट्यातील गावांमध्ये शेवटच्या टोकापर्यंत लोकांना दरदिवशी नियमित पाणी मिळेल याअनुषंगाने रु. २०२.४० कोटी किंमतीचा सुधारीत प्रस्ताव मंडळ कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला असणे या प्रस्तावस मान्यता देवून रु. २०२.४० कोटी निधी शासनाने मंजुर करणेबाबत करावयची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (४) | ६५५६ | १० | सांगली जिल्हयातील दुष्काळी जत तालुक्यामध्ये सन २०२३-२०२४ साठी ९७ टँकरद्वारे ७६ गावांना व ५३८ वाडयावस्त्यांना पाणी पुरवठा करण्यात आला आहे. त्यासाठी विहरी, बोर, अधिगृहण देयके, खाजगी टँकर देयके, इंजिन डिझेल, देयके तसेच शासकीय टँकर डिझेल देयके असे एकूण जत तालुक्यासठी २० कोटी रुपयेची आवश्यकता असून यासाठी त्वरीत निधीची उपलब्धता करण्याची गरज व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १० जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई